रिटमध्ये घेता येईल.

# प्रेमाने बनवा गिफ्ट्स

व्हॅलेंटाईन डे आता फक्त दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. या वर्षी त्याला किंवा तिला काय गिफ्ट द्यायचं? हा प्रश्न तुम्हालाही पडला असलेच. बाजारात आता व्हॅलेंटाईन गिफ्टसाठी अनेक पर्यायही उपलब्ध होऊ लागले आहेत. पण स्वतःच्या हाताने बनवलेले गिफ्ट केव्हाही मनमोहक असतात. शिवाय आपल्या प्रेमाचा टचही त्यात दिसून येतो. त्यासाठी खास हॉबी आयडीयाज यांनी काही हटके गिफ्ट घरी कसे बनवाल याच्या टिप्स दिल्या आहेत. अगदी साहित्यापासून ते कृतीपर्यंत या साऱ्या गोष्टी त्यांनी शेअर केल्यात.

## लव्ह फोटो फ्रेम




**साहित्य :** पाण्याचे भांडे, कलर पॅलेट, पेन्सिल, ए फोर आकाराचा पांढरा कागद, ए फोर आकाराचा पिवळा कार्बन कागद.

**कृती :** एमडीएफची लाकडी फोटो फ्रेम घ्या. अक्रेलिक कलर व्हाईट २७ ने फ्रेम रंगवा. त्यानंतर ए फोर आकाराचा पांढरा कागद आणि त्यावर क्युपिड, हृदय, कपकेक्स, लव्ह बर्ड्स अशी काही प्रेमचिन्हे काढा व वेगळ्या शैलीत लव्ह या शब्दाचे स्पेलिंग लिहा. पिवळ्या कार्बन कागदाच्या मदतीने रंगवलेल्या फ्रेमवर वेगवेगळ्या टायपोग्राफीमध्ये प्रेमचिन्हे आणि लव्ह हा शब्द ट्रेस करून घ्या. यानंतर चिन्हे आणि शब्द फेव्हिक्रिल अक्रेलिक बर्न्ट सिएन्ना ०१, क्रिमसन ०४, पिंक १८ हे रंग हलक्या शेड्समध्ये वापरून रंगवा. रंगाची शेड फिकट करण्यासाठी पांढरा रंग मिसळा. त्यानंतर सुकण्यासाठी ठेवा. लव्ह शब्दाला थ्रीडी ग्लिटर आऊटलायनने आउटलाईन काढा. तयार झाले ना तुमचे लव्ह फोटो फ्रेम.

••

## सुशोभित लव्ह फोटो फ्रेम



**साहित्य :** पाण्याचे भांडे, कलर पॅलेट, रंगीत खडे (गोल आकाराचे लाल रंगाचे), सिक्विन्स (सोनेरी, चंदेरी आणि गडद गुलाबी रंगाचे), अर्धाकृती मोती.

**कृती :** एमडीएफची लाकडी 'लव्ह' फोटो फ्रेम घ्या. अक्रेलिक कलर्स क्रिमसन ०४ आणि व्हाईट २७ रंग मिसळून ही फ्रेम हलक्या गुलाबी रंगाने रंगवून घ्या. त्यानंतर ती सुकण्यासाठी ठेवा. रंगवलेल्या फ्रेमवर ठिकठिकाणी लहान व मोठ्या आकाराचे हृदय काढा. फॅब्रिक ग्लूने लाल रंगाचे खडे तसेच सोनेरी, चंदेरी व गडद गुलाबी रंगाचे सिक्विन या हृदयांवर चिकटवा. थ्रीडी आऊटलायनर नॉन स्टिकी ग्लिटर सिल्व्हर ४०२ आणि पिंक ४१० वापरून लहान आकाराची हृदये रंगवा. सुशोभित केलेल्या हृदयांवर फॅब्रिक ग्लूच्या मदतीने अर्धाकृती मोती लावा. लव्ह ही अक्षरे झरदोझी गोल्ड ५०८ नि रंगवा आणि ग्लिटर पिंक ४० नि आउटलाईन करा.

••

## हार्ट बॉक्स

**साहित्य :** रिसायकल केलेले वर्तमानपत्र, पाण्याचे भांडे, बार्बेक्यू स्टिक, माउंट बोर्ड, क्विलिंग स्ट्रिप्स (गुलाबी आणि लाल रंगाच्या), क्विलिंग टुल, पेन्सिल आणि रूलर.



**कृती :** माउंट बोर्ड घ्या आणि त्यावर ४ १/२बाय ७.५ मापाचा हृदयाचा आकार कापून घ्या. हृदयाचे असे दोन आकार कापून घ्या म्हणजे एकाचा वापर तळ म्हणून, तर दुसऱ्याचा वापर झाकण म्हणून करता येईल. आता या बॉक्सच्या बाजू बनवू या. वर्तमानपत्राचे कागद घ्या आणि बार्बेक्यू स्टिकच्या मदतीने कागदाची गुंडाळी करून नळीसारखा आकार द्या. या गुंडाळ्या १.५ लांबीने कापून घ्या. वर्तमानपत्राच्या गुंडाळ्या आधी तयार केलेल्या हृदयाच्या आकाराच्या तळभागावर फेव्हिकॉल एमआरच्या मतीने संपूर्ण कड तयार होण्याच्या दृष्टीने चिकटवून घ्या, त्यानंतर सुकण्यासाठी ठेवा. आता बॉक्सचे झाकण बनवा. झाकणासाठी बॉर्डर तयार होईल अशा पद्धतीने माउंट बोर्ड कापून त्याला आकार द्या. फेव्हिकॉल एमआरने चिकटवा. आता तळभाग आणि झाकण तयार झाल्यानंतर त्यावा व्हाईट २७चा बेस कोट द्या. सुकण्यासाठी ठेवा. क्रिमसन ०४ आणि थोडा व्हाईट २७ वापरून फिकट गुलाबी रंगात रंगवा. तेही सुकण्यासाठी ठेवा. क्विलिंग स्ट्रिप्स घेऊन त्यापासून गुलाबाची फुले बनवा. अशा प्रकारची १७-१८ फुले बनवा. ही फुले झाकणाच्या कडांवर फेव्हिकॉल एमआरने चिकटवून घ्या. तळभाग आणि झाकणाच्या कडांवर फॅब्रिक ग्लूच्या मदतीने अर्धाकृती मोती चिकटवा. बॉक्स सुकण्यासाठी ठेवून द्या. थ्रीडी आउटलायनर ग्लिटर सिल्व्हर ४०२ वापरून तुमच्या प्रिय व्यक्तीसाठी 'माय लव्ह' असा संदेश लिहा. त्यानंतर ते सुकण्यासाठी ठेवा.

••

## व्हॅलेंटाईन कार्ड




**साहित्य :** ए थ्री आकाराचा सोनेरी रंगाचा कार्डपेपर, ए फोर आकाराचा, गुलाबी रंगाचा कार्डपेपर, पेपर कटर, रंगीत खडे (लहान आकार व पांढऱ्या रंगाचे), कात्री, पेन्सिल, पाण्याचे भांडे, कलर पॅलेट.

**कृती :** ए थ्री आकाराचा सोनेरी रंगाचा कागद घ्या. कागदाची मध्यभागी घडी घाला आणि कार्डाच्या बाहेरील बाजूने चार इंचावर खूण करून घ्या. खूण केलेला भाग कात्रीने कापा. घडी घातलेले कार्ड अशाप्रकारे दिसेल. घडीमुळे तयार झालेल्या फ्लॅपवर मुलाचा आकार काढून घ्या. आकाराच्या आउटलाईनुसार कागद कापून घ्या. मुलाच्या विरुद्ध बाजूला मुलीचे चित्र काढून घ्या. चित्रांतील चेहरे आणि हात छायाचित्राप्रमाणे अक्रेलिक कलर ब्लॅक २ नि रंगवून घ्या. मुलाचा ड्रेस अक्रेलिक कलर ब्लॅक २ नि आउटलाईन करून घ्या. सुकण्यासाठी ठेवा. दोन वेगळ्या शेड्सचे पांढरे आणि गुलाबी कार्डपेपर घ्या. फ्लॉवर पंचच्या सहाय्याने फुले पंच करून घ्या. तुम्हाला १२० फुले लागतील. फेव्हिकॉल एमआरच्या सहाय्याने मुलीच्या ड्रेसवर पंच केलेली फुले चिकटवून घ्या. सुकण्यासाठी ठेवा. फेव्हिकॉल एमआरने मुलीच्या डोक्यावर पांढरे खडे चिकटवून हेडबँड तयार करा. कार्डवर अक्रेलिक कलर ब्लॅक २ ने 'विल यू बी माय व्हॅलेंटाइन' लिहा.

••